# डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर

## "करिअर कट्टा" या उपक्रमाअंतर्गत नागपूर जिल्हा संसद नियोजन समिती पदाधिकारी निवड

## अभिनंदन अहवाल

## २०२४-२५

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या "करिअर कट्टा" या उपक्रमाअंतर्गत जिल्हास्तरीय संसद नियोजन समितीची स्थापना करण्यात आली. अनेक जिल्यातील विविध महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे निवड करण्यात आले. दीक्षाभूमी स्थित डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या बी.एस्सी. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी हर्ष राजेंद्र गणवीर याची नागपूर जिल्हाच्या संसद नियोजन समितीमध्ये निवड झाली. जिल्हास्तरीय संसद नियोजन समितीचे पदाधिकारी येत्या पाच वर्षासाठी जिल्हास्तरीय नियोजन समितीमध्ये कार्यरत राहतील. सर्व पदाधिकाऱ्यांना ५२ आठवड्यात जगभरातील विविध देशांमधील १०० उद्योजकांचे मुलाखत बघायला मिळेल आणि ऑफलाइन माध्यमाद्वारे सर्वांना आय. पी. एस. अधिकारी अथवा आय. ए. एस. अधिकारी यांच्याशी सुद्धा मुलाखत घेता येईल.

या यशासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. दीपा पान्हेकर, महाविद्यालयीन समन्वयक डॉ. विद्या चौरपगार व प्रा. विठ्ठल बोंदर यांनी हर्ष गणवीरचे कौतुक व अभिनंदन केले.

या निवडीसाठी सहकार्य करणारे करिअर कट्टा अध्यक्ष श्री.यशवंत शितोळे,प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे (विभागीय प्राचार्य प्रवर्तक), प्राचार्य डॉ.सुजित मेत्रे सर (प्राचार्य प्रवर्तक ),मा. प्रा. डॉ. नरेंद्र रघटाटे (नागपूर विभागीय समन्वयक), मा. प्रा. डॉ. वर्षा वैद्य (सहविभागीय समन्वयक), डॉ.श्रीराम फरताडे (नागपूर जिल्हा समन्वयक) या सर्वांचे मनपूर्वक आभार.

